दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५१२ वा ● गुरुवार, ता. ५ फेब्रुवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# मोदींच्या रिकाम्या खुर्चीला विरोधकांचा वेढा

## प्रधानमंत्री येण्यापूर्वीच लोकसभेचे कामकाज तहकूब

**नवी दिल्ली । रयत समाचार**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आज सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमधील संघर्ष शिगेला पोहोचला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सभागृहात येण्यापूर्वीच झालेल्या जोरदार राड्यामुळे लोकसभेचे कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. विरोधी पक्षाच्या महिला खासदारांनी थेट पंतप्रधानांच्या खुर्चीच्या दिशेने धाव घेतल्याचा खळबळजनक दावा भाजप खासदार मनोज तिवारी यांनी केला असून, यामुळे सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. सकाळी राहुल गांधी यांनी माध्यमांशी बोलताना, ‘‘पंतप्रधानांमध्ये आज लोकसभेत येण्याची हिंमत नाही,‘‘ असे आव्हान दिले होते. त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी घोषणाबाजी करत वेलमध्ये धाव घेतली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,



प्रधानमंत्री सभागृहात प्रवेश करणार होते, परंतु त्याआधीच विरोधक आक्रमक झाले. तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि काँग्रेसच्या महिला खासदारांनी ट्रेझरी बेंचच्या (सत्ताधारी बाक) दिशेने कूच केली.

भाजप खासदार मनोज तिवारी यांनी या घटनेवर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले, ‘‘विरोधी पक्षातील अनेक महिला खासदार वेलमध्ये घुसून थेट पंतप्रधानांच्या खुर्चीपर्यंत गेल्या. वरिष्ठ मंत्र्यांनी वारंवार आवाहन करूनही त्या मागे हटल्या नाहीत. परिस्थिती इतकी नियंत्रणाबाहेर होती की पंतप्रधानांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला असता. त्यांच्या आक्रमक देहबोलीमुळे ते पंतप्रधानांवर हल्लाही करू शकले असते.गोंधळादरम्यान विरोधी महिला खासदारांचा गट भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्या दिशेने गेला. यामुळे सत्ताधारी पक्षाच्या महिला खासदारही आक्रमक झाल्या आणि दोन्ही बाजूंच्या महिला खासदार आमनेसामने आल्या. त्यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली. यावेळी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव

**राहुल गांधी यांनी माजी लष्करप्रमुख एम. एम. नरवणे यांचे पुस्तक दाखवत पंतप्रधानांना थेट आव्हान दिले होते. सभागृह तहकूब झाल्यानंतर प्रियांका गांधी यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. प्रधानमंत्री निषेधाला घाबरले आहेत, म्हणूनच त्यांनी सभागृहात येणे टाळले, असा आरोप त्यांनी केला.**

आणि इतर मंत्र्यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, मात्र गोंधळ थांबला नाही. अखेर काँग्रेस खासदार दीपेंद्र हुडा यांनी हस्तक्षेप करत सदस्यांना शांत राहण्याचे आवाहन केले.सभागृहातील या गदारोळामुळे महत्त्वपूर्ण विषयांवरील चर्चा होऊ शकली नाही आणि लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात खासदारांच्या वर्तनावर आता पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.




# बेल्कॉन गृहनिर्माण प्रदर्शनाला आज सुरुवात

## अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

क्रेडाई बेळगावच्या ‘बेल्कॉन २०२६’ या भव्य बांधकाम व गृहनिर्माण प्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ आज गुरुवार ता. ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता सी. पी. एड मैदानावर होणार आहे. कर्नाटकात बेंगळूरुनंतर प्रथमच बेळगाव शहरात अलिशान व संपूर्ण वातानुकूलित भव्य शामियान्यात हे प्रदर्शन होत आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री व बेळगावचे पालक मंत्री सतीश जारकीहोळी यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार असून आमदार आसिफ उर्फ राजू सेठ व कर्नाटक क्रेडाईचे अध्यक्ष भास्कर टी. नागेंद्रप्पा उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सोहळ्यास सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती राहणार असल्याची माहिती इव्हेंट चेअरमन प्रशांत वांडकर व यश इव्हेंट्सचे संचालक प्रकाश कालकुंद्रीकर यांनी दिली. सी. पी. एड मैदानावरील १ लाख स्क्वेअर फूट जागेत आयोजित या प्रदर्शनात १८० स्टॉल्स असून बेळगावातील ३०० हून अधिक रिअल इस्टेट प्रकल्पांचे सादरीकरण होणार आहे. बांधकाम साहित्य तसेच गृह वित्त व बँकिंग क्षेत्रातील ६० हून अधिक नामांकित कंपन्यांचे स्टॉल्सही असतील. सर्वसामान्य नागरिकांना एकाच छताखाली घरे, भूखंड, फ्लॅट्स, व्यावसायिक जागा, नवीन बांधकाम साहित्य व अंतर्गत सजावटीचे पर्याय पाहण्याची संधी मिळणार आहे. ५ ते ८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन खुले राहणार असून बेळगावसह उत्तर कर्नाटक, गोवा व पश्चिम महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने नागरिक भेट देतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.



# पुणे एक्सप्रेस वे अपघाताचा परिणाम; एसटीच्या १३९ फेऱ्या रद्द

**मुंबई । रयत समाचार**

पुणेमुंबई एक्सप्रेस वेवर झालेल्या टँकर अपघातामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली असून या घटनेचा परिणाम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बस सेवांवर झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध मार्गांवरील एकूण १३९ बस फेऱ्या रद्द करण्यात आल्याची माहिती परिवहन विभागाकडून देण्यात आली आहे. रद्द करण्यात आलेल्या बस फेऱ्यांमध्ये ७३ ई-शिवनेरी तर ६६ इतर बस फेऱ्यांचा समावेश आहे. अपघातानंतर निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीमुळे एसटी महामंडळाची एकूण १६३ वाहने एक्सप्रेस वेवर अडकली होती. यामध्ये सातारा विभागातील ४६, सोलापूर विभागातील ३६, पुणे विभागातील २०, सांगली विभागातील १८, कोल्हापूर विभागातील १३, पालघर विभागातील १२, ठाणे विभागातील ११ तसेच मुंबई विभागातील ७ वाहनांचा समावेश आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून परिस्थितीचा सातत्याने आढावा घेत पर्यायी व्यवस्था उभारण्यात आल्या आहेत. वाहतूक सुरळीत होताच बस सेवा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्यात येतील, असे महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.

# दुबईत ‘महाबिझ २०२६’ यशस्वी

## २५ हून अधिक देशांतील प्रतिनिधी उपस्थित

**दुबई । राम कोंडीलकर**

GMBF ग्लोबल (गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम) यांच्या वतीने आयोजित ‘महाबिझ २०२६’ या आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषदेचा नववा अध्याय दुबई येथे यशस्वीपणे पार पडला. परिषदेत २५ हून अधिक देशांतील ८०० पेक्षा जास्त प्रतिनिधींनी सहभाग घेतला. ३१ जानेवारी रोजी अल हब्तूर पोलो क्लब येथे सुरू झालेली परिषद १ फेब्रुवारी रोजी अटलांटिस द पाम येथे समारोपाने पूर्ण झाली. भारत, यूएई, जीसीसी, मेना प्रदेश, आफ्रिका, युरोप, ऑस्ट्रेलिया व दक्षिण-पूर्व आशियातील उद्योजक, गुंतवणूकदार व उद्योग संघटनांचे प्रतिनिधी




सहभागी झाले होते. ‘ Contacts to Contracts ’ ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून प्रत्यक्ष व्यावसायिक परिणाम साधणे हा उद्देश होता. उद्घाटन सत्रे व परिसंवादांत भारतयूएई व्यापार संधी, CEPA चे फायदे, आफ्रिकेतील व्यवसाय संधी, तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता, नेतृत्व विकास तसेच खरेदीदारविक्रेता संवादावर चर्चा झाली. विवेक कोल्हटकर यांनी संरचित खरेदीदारपुरवठादार भेटी घडवून आणल्या. परिषदेस भारताचे दुबईतील महावाणिज्य दूत सतीश कुमार सिवन, शारजाह सल्लागार परिषदेचे अध्यक्ष डॉ. अब्दुल्ला बेलहैफ अल नुएमी, तारीक अल सुवैदी, फहाद अल गर्गावी, माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे व प्रमुख पाहुणे डॉ. खोराकीवाला उपस्थित होते. तज्ज्ञ सत्रांद्वारे अनुभव कथन व विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंद आचार्य स्वामी यांच्या प्रवचनाने कार्यक्रमाला सांस्कृतिक अधिष्ठान लाभले. GMBF ग्लोबलचे अध्यक्ष डॉ. सुनील व्ही. मांजरेकर म्हणाले, महाबिझ हे जागतिक व्यावसायिक संवाद घडवून आणणारे आणि प्रत्यक्ष करार साधणारे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.

# राष्ट्रीय खो-खो पटू सुनिल लाड आता मुंबई मनपाचे प्रमुख अधिकारी

**मुंबई । राम कोंडीलकर**



राष्ट्रीय खो-खो पटू तथा क्रीडा प्रसारक सुनिल लाड यांची मुंबई महानगरपालिकेच्या दुकाने व आस्थापना विभागाचे प्रमुख अधिकारी (प्र) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लाड हे डॉ. शिरोडकर हायस्कूल व महर्षी दयानंद कॉलेजचे विद्यार्थी असून युवक क्रीडा मंडळ, परळ या संघातर्फे त्यांनी अनेक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये १९८६ ते १९८९ या कालावधीत सलग चार वेळा त्यांनी मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करत त्यांनी बी.कॉम., एम.ए. व एल.एल.एम. अशी उच्चशिक्षणाची पदवी संपादन केली आहे. कोकण व मुंबईतील विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध असून सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. दुकाने व आस्थापना विभागात कार्यरत असताना त्यांनी प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापराविरोधात प्रभावी जनजागृती केली. यासाठी अनेक शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था तसेच व्यापारी संघटनांच्या सहकार्याने नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे पटवून दिले. कोविड-१९ महामारीच्या काळात त्यांनी बजावलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मुंबई महानगरपालिकेतर्फे त्यांचा विशेष गौरव करण्यात आला होता. त्यांच्या या नियुक्तीबद्दल विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# झेडपी निवडणुका पुन्हा लांबणीवर; २३ फेब्रुवारीला सुनावणी

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्रातील प्रलंबित जिल्हा परिषद व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील ओबीसी आरक्षणासंदर्भातील सुप्रीम कोर्टातील सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. आता ही सुनावणी ता. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असल्याने उरलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांचे भवितव्य आणखी अनिश्चित झाले आहे. सदर प्रकरणाची सुनावणी यापूर्वी २१ जानेवारी रोजी होणार होती. मात्र ती पुढे ढकलून २७ जानेवारी रोजी ठेवण्यात आली. त्यानंतर ४ फेब्रुवारी रोजी सुनावणी होईल, अशी अपेक्षा होती. मात्र आज पुन्हा ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली असून आता २३ फेब्रुवारी ही पुढील तारीख निश्चित करण्यात आली आहे. ओबीसी आरक्षणाबाबतचा निर्णय या सुनावणीवर अवलंबून असल्याने राज्यातील उरलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका कधी होणार, याबाबत सध्या कोणतीही स्पष्टता नाही. वारंवार सुनावणी लांबत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संभ्रम कायम असून राजकीय वर्तुळातही याबाबत तीव्र चर्चा सुरू आहे.



# एनएसयूआयच्या प्रवासाला पूर्णविराम

## नौशाद चौधरी युवक काँग्रेसमध्ये दाखल

**पणजी । रयत समाचार**



गोव्यातील विद्यार्थी चळवळीतील महत्त्वाचे नेतृत्व म्हणून ओळख असलेले नौशाद चौधरी यांनी तब्बल दहा वर्षांच्या सेवेनंतर नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय) चा औपचारिक निरोप घेतला आहे. गेल्या पाच वर्षांपासून राज्याध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत त्यांनी गोव्यातील विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व केले. आपल्या राजीनाम्याबाबत प्रतिक्रिया देताना नौशाद चौधरी यांनी एनएसयूआयमधील प्रवास हा सन्मान आणि मोठी जबाबदारी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी लढताना मिळालेल्या संधीबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. या काळात संघटनेने दिलेल्या पाठबळामुळेच विद्यार्थी चळवळ अधिक मजबूत झाल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, नौशाद चौधरी आता गोवा प्रदेश युवक काँग्रेसमध्ये राज्य महासचिव म्हणून नवी जबाबदारी स्वीकारत आहेत.

युवकांचे सक्षमीकरण, सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका आणि ‘‘गोवा वाचवण्याचा’’ संकल्प पुढे नेत सार्वजनिक जीवनात कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी त्यांनी ऑल इंडिया काँग्रेस कमिटी (एआयसीसी), एनएसयूआय तसेच गोवा प्रदेश काँग्रेस कमिटी (पीसीसी)च्या नेतृत्वाचे मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार मानले. नव्या भूमिकेतूनही युवकांच्या हितासाठी आणि गोव्याच्या भविष्याकरिता काम करत राहण्याची ग्वाही त्यांनी दिली.

# मुख्यमंत्री ममता बॅनर्जींचा सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद

## मतदारयादी सुधारणा प्रकरणी स्वतः मांडली बाजू

**नवी दिल्ली । रयत समाचार**

सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासात प्रथमच एखाद्या विद्यमान मुख्यमंत्र्यांनी थेट न्यायालयात हजर राहून स्वतः युक्तिवाद करत ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मतदारयादी विशेष सुधारणा (एसआयआर) प्रकरणात मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात स्वतः बाजू मांडली. सहसा अशा प्रकरणांत मुख्यमंत्री वकील किंवा सल्लागारांच्या माध्यमातून युक्तिवाद करतात. सुनावणीदरम्यान ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगावर पश्चिम बंगालला लक्ष्य केल्याचा आरोप केला. ‘‘मी पश्चिम बंगालमधून आले आहे आणि राज्याचे प्रतिनिधित्व करते. न्याय दाराआड रडतोय, असे वाटत आहे. आम्हाला कुठेच न्याय मिळत नाही,’’

**ममता बॅनर्जी यांनी दावा केला की, एसआयआर प्रक्रियेचा वापर मतदारांना समाविष्ट करण्यासाठी नव्हे तर त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यासाठी केला जात आहे. आतापर्यंत सुमारे ५८ लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. शेती हंगामात ग्रामीण भागातील नागरिकांना त्रास दिला जात असल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.**



असे भावनिक शब्दांत त्यांनी खंडपीठासमोर सांगितले. निवडणुकीपूर्वी अवघ्या तीन महिन्यांत अशी प्रक्रिया राबवली जात असून, प्रत्यक्षात यासाठी किमान दोन वर्षांचा कालावधी आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, निवडणूक आयोगाने प्रतिवाद करताना सांगितले की, एसआयआरसाठी आवश्यक मनुष्यबळ राज्य सरकारकडून वेळेवर उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करावी लागली. आयोगाने सर्व प्रक्रिया नियमानुसार झाल्याचा दावा केला. या प्रकरणी सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, खरे मतदार मतदारयादीतून वगळले जाऊ नयेत. नावांच्या स्पेलिंगच्या चुकांसाठी नोटिसा देणे टाळावे, असे निर्देश निवडणूक आयोगाला देण्यात आले. तसेच पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी व निवडणूक आयोगाने ९ फेब्रुवारीपर्यंत आपले उत्तर सादर करावे, असे आदेश खंडपीठाने दिले. सुनावणीनंतर काँग्रेस व तृणमूल काँग्रेसच्या वतीने सांगण्यात आले की, पंतप्रधानांनी विरोधाच्या पार्श्वभूमीवर सभागृह टाळले. तर सत्ताधारी पक्षाकडून या आरोपांचा इन्कार करण्यात आला आहे. ममता बॅनर्जी यांनी १९८२ मध्ये एलएलबी पदवी पूर्ण केली असून, या प्रकरणात स्वतः युक्तिवाद करण्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष परवानगीही मागितली होती. मुख्यमंत्री म्हणून तसेच याचिकाकर्त्या म्हणून प्रकरणाची सखोल माहिती असल्याचे त्यांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे.

# महापौरपदाच्या 'रोटेशन'वर आक्षेप

## अहिल्यानगर प्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रार


## ओबीसी नगरसेवक कार्यकर्त्यांची बोटचोपी भुमिका?

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या निवडीवरून राज्यातील ओबीसी संघटनांनी तीव्र आक्षेप नोंदवला असून, निवडणूक प्रक्रियेनंतर थेट भारत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

ओबीसी महिलांसाठी राखीव असलेल्या या पदावर रोटेशन पद्धतीनुसार संधी देणे अपेक्षित असताना, ती पद्धत डावलली जात असल्याचा आरोप ओबीसी नेत्यांनी केला आहे. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ओबीसी जनमोर्चा आणि स्थानिक ओबीसी हक्क संरक्षण समितीच्या नेत्यांनी स्पष्ट भूमिका मांडली. अहिल्यानगर महानगरपालिकेचे महापौरपद ओबीसी महिलेसाठी राखीव असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे यांची युतीकडून उमेदवारी जाहीर झाली आहे. गाडे या ओबीसीतील कुणबी घटकातील असून त्यांचा एकमेव अर्ज दाखल आहे. ओबीसी नेत्यांचे म्हणणे आहे की, हा आक्षेप कोणत्याही एका व्यक्तीविरोधात नसून, ओबीसी उपजातींना रोटेशननुसार मिळणाऱ्या संधींचे उल्लंघन होत असल्याबाबत आहे. "विशिष्ट राजकीय सोयीसाठी नियमांची पायमल्ली केली जात आहे. ज्यांना संधी मिळायला हवी होती त्या उपजातींना डावलले जात आहे," असा आरोप करण्यात आला. त्यामुळे या प्रक्रियेला स्थगिती द्यावी किंवा तातडीने फेरविचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. "प्रस्थापित राजकीय पक्ष ओबीसी आरक्षणाचा वापर केवळ सत्तेसाठी करत आहेत; प्रत्यक्षात ओबीसी प्रतिनिधींना निर्णयप्रक्रियेत स्थान दिले जात नाही," असा गंभीर आरोपही पत्रकार परिषदेत करण्यात आला. निवडणूक आयोगाने हरकतीची दखल न घेतल्यास अहिल्यानगरमध्ये तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

तसेच सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास उच्च न्यायालयात दाद मागण्याचे संकेतही देण्यात आले. पत्रकार परिषदेत याचिकाकर्ते मंगेश ससाणे, ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष प्रकाश शेंडगे, ओबीसी अभ्यासक व नेते प्रा. श्रावण देवरे, स्थानिक ओबीसी चळवळीतील सक्रिय नेते दशरथ राऊत, बाळासाहेब कर्डिले आदींनी संयुक्तपणे भूमिका मांडली. केवळ अहिल्यानगरच नव्हे, तर राज्यातील इतर ठिकाणीही अशाच प्रकारे रोटेशन डावलले जात असल्याच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यात आले. प्रकरणावर निवडणूक आयोगाची भूमिका आणि पुढील कायदेशीर हालचालींवर राज्याचे लक्ष केंद्रित झाले आहे.






# बाळासाहेब देशमुख यांच्या 'रंग माझा वेगळा' कथासंग्रहाचे प्रकाशन

**अहमदनगर । रयत समाचार**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सावेडी तर्फे जिल्ह्यातील साहित्यिकांची सहविचार संवाद सभा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी सावेडी शाखाध्यक्ष व उद्योगपती नरेंद्र फिरोदिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र साहित्य परिषद नगर जिल्हाप्रमुख जयंत येलूलकर यांनी केले. या वेळी कथालेखक बाळासाहेब देशमुख यांच्या 'रंग माझा वेगळा' या कथासंग्रहाचे प्रकाशन प्रा. मिलिंद जोशी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा कथासंग्रह सकाळ प्रकाशनतर्फे प्रकाशित असून ज्येष्ठ साहित्यिक कथालेखक सदानंद भणगे यांची प्रस्तावना त्याला लाभली आहे. या कथासंग्रहात दै. नगर टाइम्सचे संपादक श्रीराम जोशी यांचा 'माणसे वाचणारा अवलिया' हा कथासंग्रहावर आधारित लेख समाविष्ट आहे. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे, चंद्रकांत पालवे, संजय कळमकर, लीला गोविलकर, शब्बीर शेख, श्रीराम जोशी, विजयसिंह होलम, सुदर्शन धस, सुनील गोसावी, शर्मिला गोसावी, शामा मंडलिक, चंद्रकांत जोशी, एम. पी. दिवान, राजेंद्र उदागे, ज्ञानदेव पांडुळे, ल. धो. खराडे, अरविंद ब्राह्मणे, नंदकुमार देशपांडे, प्रा. स्वाती अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ साहित्यिक व प्रकाशक गणेश भगत यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. उपाध्ये यांनी केले.

# 'नो पार्किंग' दंडाच्या रकमेत कपात

## आयुक्त यशवंत डांगे यांचे आदेश

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर शहरात नो पार्किंग झोनमध्ये लावण्यात येणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांवर आकारल्या जाणाऱ्या दंडाच्या रकमेत महानगरपालिकेकडून कपात करण्यात आली आहे. नव्याने निश्चित करण्यात आलेल्या दरांनुसारच दंड आकारणी करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदार संस्थेला देण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. महानगरपालिकेच्या निविदा प्रक्रियेतून दिग्विजय एंटरप्रायझेस या संस्थेला नो पार्किंग कारवाईचे काम देण्यात आले आहे. मात्र कारवाईदरम्यान दंडाच्या रकमांबाबत नागरिकांकडून तक्रारी येत होत्या.

### दंडाचे नवे दर

**दुचाकी वाहन** – टोइंग कारवाई : ₹ ५०० + GST, क्लॅम्पिंग कारवाई – ₹ ३०० + GST, **चारचाकी वाहन**– टोइंग कारवाई : ₹ ८०० + GST, क्लॅम्पिंग कारवाई : ₹ ४०० + GST




तसेच दंडाची रक्कम जास्त असल्याने ती कमी करण्यात यावी, अशी मागणीही सातत्याने होत होती. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने दंडाच्या रकमेत कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. महानगरपालिकेने निश्चित केलेल्या नव्या दरांनुसारच आता नो पार्किंग कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी त्याची नोंद घ्यावी, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



# ज्ञानेश्वरनगर येथे हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात

**अहमदनगर । रयत समाचार**

ज्ञानेश्वरनगर येथील महिलांनी एकत्र येत परंपरा, आपुलकी व सामाजिक एकोपा जपणारा सार्वजनिक हळदी-कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित केला. या कार्यक्रमास नवनिर्वाचित नगरसेविका दीपाली बारसकर, संध्या पवार, रुपाली वारे, पूनम तवले व रोशनी त्र्यंबके या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व महत्त्व सुनीता तागड यांनी अत्यंत समर्पक शब्दांत विशद केले. त्यांनी संक्रांती सणामागील सामाजिक संदेश स्पष्ट करताना सांगितले की, तीळ जरी रंगाने पांढरा व साधा असला तरी स्नेह वाढवणारा आहे, तर गूळ पिवळा, गोड व मधुर असतो. या दोघांची सांगड घालून तिळगुळ तयार होतो. त्याचप्रमाणे समाजातील वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्तींनी परस्परांशी प्रेम, सौजन्य व आपुलकीने वागले पाहिजे. संक्रांतीच्या निमित्ताने समाजाशी एकरूप होण्याचा संकल्प करून चांगल्या चाली-रीती अंगीकाराव्यात व वाईट प्रवृत्ती दूर केल्यास या सणामागील खरा उद्देश साध्य होईल, असे त्यांनी सांगितले. 'मी प्रत्येकाशी गोड बोलेन' असा संकल्प सर्वांनी केल्यास संक्रांत हा सण केवळ तिळगुळ घ्या, गोड बोला एवढ्यापुरता न राहता तो विचारांत व कृतीतून दिसून येईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी चंदूकाका सराफ यांनी विविध स्पर्धांचे आयोजन करून महिलांना संक्रांतीचे वाण दिले. त्यामुळे कार्यक्रमात अधिक रंगत व उत्साह निर्माण झाला. कार्यक्रमास ज्ञानेश्वरनगर परिसरातील महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या. सुनीता तागड, जगदाळे, नंदा घुले, अंजली डांगे, रोहिणी शेळके, शिला देशमुख, वनिता गाडे, रंजना खिलारी, सुवर्णा घुगरकर, भाग्यश्री चव्हाण आदी महिलांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. सामाजिक सलोखा, परंपरेचे जतन व महिलांचा सहभाग यांचा सुंदर संगम या सार्वजनिक हळदी-कुंकू कार्यक्रमातून पाहायला मिळाला.

# पाचव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी प्रा. डॉ. चौहान

**नगर तालुका । रयत समाचार**

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त बुधवार, ता. १९ फेब्रुवारी रोजी पाचव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे माजी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) संचालक व विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. डॉ. महावीरसिंग रामचरण चौहान यांची निवड करण्यात आली आहे. हे साहित्य संमेलन स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील परिवार मंगल कार्यालयात होणार आहे. या संमेलनात राज्यभरातील ज्येष्ठ व नवोदित साहित्यिक, कवी, लेखक व विचारवंत सहभागी होणार असून लोककलावंत व शाहीरांच्या सादरीकरणातून लोककलेचे दर्शन घडणार आहे. संमेलनानिमित्त समाजाच्या विविध क्षेत्रांत निस्वार्थ भावनेने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील साहित्यिक, कवी, लेखक, युवक व लोककलावंतांसाठी हे संमेलन प्रेरणादायी ठरेल, अशी माहिती डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे व श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे यांनी दिली. संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. महावीरसिंग रामचरण चौहान हे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांतील कृषी संलग्न महाविद्यालयांचे कला,



क्रीडा, सांस्कृतिक व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक (एनएसएस) तसेच विद्यार्थी कल्याण संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांनी एम.एस्सी. (अ‍ॅग्री) व पी.एच.डी. पर्यंतचे शिक्षण घेतले असून ३३ वर्षांची प्रदीर्घ सेवा बजावली आहे. सध्या ते सॉईल सायन्स व कृषी रसायनशास्त्र विभागात एम.एस्सी. व पी.एच.डी. विद्यार्थ्यांना अध्यापन करतात. शैक्षणिक क्षेत्रासोबतच ते गायक, संगीतकार, कवी व गीतकार असून मराठी व हिंदी चित्रपटांतही त्यांनी अभिनय केला आहे. त्यांनी हिंदी पोवाड्यांची रचना व गायन केले असून त्यांच्या रचनांतील शनीभक्तीगीते सुप्रसिद्ध गायिका साधना सरगम व सोनाली वाजपायी यांनी गायिली आहेत. त्यांच्या नावावर पाच पोवाड्यांच्या ऑडिओ कॅसेट्स असून हजाराहून अधिक गीते व कविता त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांनी 'एक रुपया चांदी का', 'देश मेरा गांधी का', 'आस्था' या हिंदी चित्रपटांत तसेच 'लगन' या मराठी चित्रपटात भूमिका साकारल्या आहेत.

# तृतीयपंथीयांसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन सुरू

## तक्रारींसाठी '१४४२७'वर संपर्क साधण्याचे आवाहन

**अहमदनगर । रयत समाचार**

केंद्र शासनाने तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा, २०१९ व नियम, २०२० अन्वये तृतीयपंथीय समाजासाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल तसेच तक्रारींसाठी '१४४२७' हा राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक सुरू केला आहे.

या सुविधेचा जिल्ह्यातील सर्व तृतीयपंथीयांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे. तृतीयपंथीय नागरिकांनी transgender.dosje.gov.in या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करून तृतीयपंथीय असल्याचे प्रमाणपत्र व ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे. नोंदणी प्रक्रियेत किंवा इतर कोणत्याही बाबतीत अडचण आल्यास राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक १४४२७ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या हेल्पलाईन व पोर्टलच्या माध्यमातून तृतीयपंथीयांना विविध शासकीय योजना, अर्ज प्रक्रिया, आवश्यक मार्गदर्शन, अडचणींचे निराकरण तसेच तक्रारी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, असेही सहाय्यक आयुक्तांनी स्पष्ट केले.

# वृक्षसंवर्धन व श्रमदानातून संत शिरोमणी नरहरी सोनार महाराज पुण्यतिथी साजरी

## हरदिन मॉर्निंग ग्रुपचा सामाजिक उपक्रम; भिंगारमध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**अहमदनगर । रयत समाचार**

हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने संत शिरोमणी नरहरी सोनार महाराज यांची पुण्यतिथी सामाजिक बांधिलकी जपत वृक्षसंवर्धन व श्रमदानाच्या माध्यमातून साजरी करण्यात आली. भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये हा अभिवादन सोहळा सामाजिक जाणीव जपत पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत शिरोमणी नरहरी सोनार महाराज यांच्या प्रतिमेस रतन मेहेत्रे, सुधीर कपाळे, सुभाष पेंढुरकर व प्रकाश देवळालीकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिरीषराव पोटे व महेशराव सरोदे यांच्या पुढाकाराने हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी श्रमदानात सहभाग घेतला. यावेळी संपूर्ण उद्यानातील वाढलेले गवत व काटेरी झुडपे काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच लावलेल्या झाडांना पाणी देऊन त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी घेण्यात आली. या उपक्रमासाठी हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, जहीर सय्यद, रमेश वराडे, दिलीप ठोकळ, सर्वेश सपकाळ, दीपकराव धाडगे, दिलीप गुगळे, अशोक पराते, मनोहर दरवडे, दीपक घोडके, अविनाश जाधव, अभिजीत सपकाळ, रामनाथ गर्जे, विलास आहेर, इंजि. अनिल सोळसे, राजू कांबळे, निजाम पठाण, ताराचंद ठोकळ, भरत डंगोरे, संजय भिंगारदिवे, सूर्यकांत कटोरे, दीपक लिपाने, दशरथ मुंडे, सखाराम अळकुटे, नवनाथ वेताळ, योगेश चौधरी, अविनाश पोतदार, सुहास देवराईकर, आसाराम बनसोडे, संदीप छजलाने, दीपक अमृत, अजेश पुरी, संजय शिंगवी आदी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजय सपकाळ म्हणाले की, संत शिरोमणी नरहरी सोनार महाराजांनी समाजाला प्रामाणिक श्रम, सेवा व समतेचा मार्ग दाखवला. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाषणांऐवजी प्रत्यक्ष श्रमदान व वृक्षसंवर्धनातून विचार कृतीत उतरवण्याचा प्रयत्न करण्यात आला. सचिन चोपडा यांनी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून वृक्षारोपण, श्रमदान व स्वच्छतेतून समाजात सकारात्मक बदल घडवता येतो, असे मत व्यक्त केले. हभप ज्ञानेश्वर महाराज अनावडे म्हणाले की, संत परंपरा ही केवळ पूजा-अर्चेपुरती मर्यादित नसून आचरणातून व्यक्त व्हावी. हरदिन मॉर्निंग ग्रुपने पुण्यतिथी श्रमदान व वृक्षसंवर्धनातून साजरी करून संत विचारांची खरी सेवा केली, असे त्यांनी सांगितले.

रयत समाचार Classified

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# श्रीरामपूरकरांच्या आरोग्याशी खेळ

## स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत असल्याची लेखी हमी द्या - भाजपची मागणी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या साठवण तलावामध्ये मैलामिश्रित, दुर्गंधीयुक्त गटारीचे पाणी सोडले जात असल्याचा धक्कादायक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

या गंभीर प्रकरणाची तात्काळ शहानिशा करून वस्तुस्थिती समोर आणावी, जर खरोखरच मैलामिश्रित गटारीचे पाणी पिण्यासाठी दिले जात असेल तर संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी भारतीय जनता पार्टी, श्रीरामपूर शहरच्या वतीने मुख्याधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात आले. पिण्याच्या पाण्यासारख्या अत्यंत संवेदनशील विषयात कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही अन्यथा सर्वसाधारण सभेत हा मुद्दा सोडविल्याशिवाय कामकाज सुरू करू देणार नाही असा इशारा भाजप गटनेत्या वैशाली चव्हाण व स्थायी समिती सदस्य आशिष धनवटे यांनी दिला. हा विषय कोणत्याही प्रकारच्या राजकारणाचा नसून थेट श्रीरामपूर शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असल्याने प्रशासनाने शहानिशा करून कठोर भूमिका घ्यावी'' अशी मागणी भाजपाचे शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड यांनी मांडली. पिण्याच्या पाण्यात मैला सोडण्याचे घाणेरडे कृत्य धोकादायक असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होणार आहे पाणीपुरवठा व्यवस्थेतील हलगर्जीपणा दूर करण्याची मागणी नगरसेवक संजय गांगड व रवी पाटील यांनी केली.



**सदर व्हिडिओची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, साठवण तलाव, पाणीपुरवठा लाईनची तातडीने तपासणी करावी, पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावे, दोषी आढळल्यास संबंधितांवर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करावी, शहरातील नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळत असल्याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी भाजप शिष्टमंडळाने केली.**

**पुढील २४ तासात या प्रकरणाची शहानिशा करून योग्य ती कार्यवाही केली जाईल.**
**मच्छिंद्र घोलप,** मुख्याधिकारी

सहा महिन्यांपूर्वी अशी घटना घडली होती, यासह असे अनेक प्रश्न माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे, नगरसेवक दिपक चव्हाण यांनी उपस्थित केले. यावेळी महिला भाजप महिला शहराध्यक्षा स्वाती चव्हाण, नगरसेवक मनोज लबडे, पुजा चव्हाण, विशाल अंभोरे, अर्जुन कर्पे, रुपेश हरकल, बाळासाहेब हरदास, अमोल शेटे, प्रतीक वैद्य, सुभोत शेवतेकर, प्रशांत शितोळे, सचिन धोत्रे, राहुल फुलारे, नवनाथ पवार, किरण पठारे, अवधूत शिंदे, सागर म्हस्के, कार्तिक मंडवे, अजय छल्लारे, किरण कर्नावट, अनिल खंडागळे, सचिन पवार आदी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सामाजिक बांधिलकी जपणारे स्नेहसंमेलन चर्चेत

## सत्काराला फाटा देत अनाथांच्या शिक्षणासाठी मदत

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव येथील के.जे. सोमय्या महाविद्यालयाच्या १९९५९६ बॅचचे स्नेहसंमेलन केवळ जुन्या आठवणींना उजाळा देणारे न ठरता समाजाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारे ठरले आहे. सत्कार, फुलांचा वर्षाव व डामडौल टाळत त्या खर्चातून अनाथ व गरजू बालकांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याचा एकमुखी निर्णय माजी विद्यार्थ्यांनी घेतल्याने हे स्नेहसंमेलन सर्वत्र चर्चेचा विषय ठरले. या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने शिर्डी येथील अनाथ व गरजू बालकांच्या शिक्षण व संगोपनासाठी कार्यरत असलेल्या 'साई सावली बालपरिवार' या सामाजिक संस्थेला आर्थिक मदत करण्यात आली. आजच्या काळात स्नेहसंमेलन म्हणजे दिखाऊपणा अशी समजूत निर्माण होत असताना, के.जे.एस. महाविद्यालयाच्या या बॅचने जाणीवपूर्वक त्याला फाटा देत समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देऊन वेगळा आदर्श निर्माण केला आहे. दीर्घकाळानंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी मैत्री, आपुलकी, परस्पर सन्मान आणि शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. मात्र हा आनंद केवळ आठवणींपुरता मर्यादित न ठेवता समाजाप्रती असलेली जबाबदारी त्यांनी कृतीतून दाखवून दिली. कार्यक्रमात कोणताही दिखाऊपणा न ठेवता साधेपणा, सामाजिक जाणीव आणि सकारात्मक संदेश यांनाच महत्त्व देण्यात आले. या प्रसंगी अनेक माजी विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशाच सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प व्यक्त केला. नाशिक, अहिल्यानगर, पुणे, मुंबई तसेच महाराष्ट्राच्या विविध भागांतून माजी विद्यार्थ्यांनी या स्नेहसंमेलनास मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. स्नेहसंमेलनात दिवंगत माजी विद्यार्थी, शिक्षक तसेच दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रेरणादायी स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी बाजीराव गवारे, भारत जपे, विनोद नाईकवाडे, राजेंद्र काशीद, राहुल रोहमारे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण

## धास्तावलेल्या विद्यार्थ्यांचे पलायन

**कोपरगाव । किसन पवार**

नगरमनमाड महामार्गालगत असलेल्या एका इंग्रजी माध्यम आश्रम शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना शिस्तीच्या नावाखाली अमानुष मारहाण केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेनंतर काही विद्यार्थी भीतीपोटी शाळेतून पळून गेल्याची धक्कादायक बाब समोर आली असून आश्रम शाळेत भीतीचे वातावरण पसरले आहे.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांनी किरकोळ कारणावरून विद्यार्थ्यांना पाईप तसेच हाताने बेदम मारहाण केली. या मारहाणीमुळे काही विद्यार्थी मानसिक तणावाखाली आले असून जीवाच्या भीतीने त्यांनी आश्रम शाळा सोडून पळ काढल्याचे निष्पन्न झाले.

**घडलेला प्रकार विद्यार्थ्यांनी पालकांना सांगताच पालकांनी शाळेत धाव घेतली. काही विद्यार्थ्यांच्या अंगावर मारहाणीच्या खुणा स्पष्टपणे दिसून आल्याने पालक संतप्त झाले. आश्रम शाळा सुरक्षित नसतील तर आमच्या मुलांना कुठे पाठवायचे? असा संतप्त सवाल पालकांनी उपस्थित केला.**

विशेष म्हणजे ही सर्व मुले शाळेपासून १०० ते १५० किलोमीटर अंतरावरून आलेली असल्याने पालकांना वेळोवेळी मुलांकडे लक्ष देणे शक्य होत नाही. या घटनेची माहिती संबंधित पालकांनी शिक्षण विभाग व आदिवासी विकास विभागाला दिली असून दोषी शिक्षक व कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांना मानसिक समुपदेशन देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थी पळून गेल्याच्या घटनेमुळे शाळा प्रशासनाच्या हलगर्जीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून विद्यार्थ्यांच्या मनावर मानसिक दडपण निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, शाळा प्रशासनाकडून अद्याप अधिकृत खुलासा करण्यात आलेला नसला तरी शासकीय यंत्रणेकडून चौकशी सुरू असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. या घटनेमुळे निवासी शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानामुळे केळी उत्पन्नात वाढ- डॉ. खर्चे

## केळी दिवस व शिवारफेरी उत्साहात

**राहुरी । रयत समाचार**

केळी पिकात सुधारित लागवड पद्धती, रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन, उत्पादन खर्चात बचत आणि नवीन संशोधनावर आधारित आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास केळी उत्पादन व उत्पन्नात निश्चित वाढ होईल, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत केळी संशोधन केंद्र, जळगाव येथे फुले कृषि महोत्सव-२०२६ अंतर्गत आयोजित केळी दिवस व शिवारफेरी कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. खर्चे यांच्या हस्ते झाले. यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, सहयोगी अधिष्ठाते डॉ. बबनराव इल्हे, डॉ. ए. बी. होले, डॉ. संदीप पाटील, जैन इरिगेशनचे डॉ. के. बी. पाटील, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कुरबान तडवी, केळी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. अरुण भोसले आदी उपस्थित होते. तांत्रिक चर्चासत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता व ड्रोन वापर, केळी प्रक्रिया, लागवडीतील अडथळे व उपाय, जिल्ह्यातील केळी पिकाची सद्यस्थिती तसेच जमीन आरोग्य व्यवस्थापन या विषयांवर तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी आधुनिक केळी लागवड व रोग व्यवस्थापनावरील प्रकाशने विमोचित करण्यात आली तसेच सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आदर्श शेती पुरस्काराने गौरविण्यात आले. शिवारफेरीदरम्यान शेतकऱ्यांना संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर देशातील सुमारे ८० केळी वाणांची प्रायोगिक लागवड पाहण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अरुण भोसले यांनी केले. सूत्रसंचालन वैभव सूर्यवंशी यांनी तर चंद्रशेखर गुळवे यांनी मानले. या कार्यक्रमास राज्यभरातून ४०० हून अधिक शेतकरी उपस्थित होते.



# सन फार्मा विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

## रेखाकला परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**अहमदनगर । रयत समाचार**

नागापूर येथील सन फार्मा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट रेखाकला परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. अतिवृष्टीमुळे सप्टेंबर २०२५ मध्ये होऊ न शकलेली ही परीक्षा नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आली होती.

या परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश मिळवले. अ श्रेणीत २७ विद्यार्थी, ब श्रेणीत २६ विद्यार्थी तर क श्रेणीत १२ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक व आर.एस.पी. अधिकारी राज धस यांनी मार्गदर्शन केले.



यशस्वी विद्यार्थ्यांच्या अभिनंदनासाठी ग्रामीण विकास मंडळाचे अध्यक्ष दादाभाऊ कळमकर, सचिव बबनराव कातोरे, उपाध्यक्ष शांताराम गाडे पाटील, अभिषेक कळमकर, शाळा समिती अध्यक्ष सुदाम भोर, रावसाहेब सत्रे, प्रकाश शेठ गुगळे यांच्यासह सर्व संस्था पदाधिकारी उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब सातपुते तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. अ श्रेणीत : ओम धेंडुळे, आदिती धानुरकर, अनुजा मानमोडे, देवयानी जाधव, हर्षदा विघ्ने, इरा साळुंके, नयन महाजन, सेजल चव्हाण, श्रद्धां ओहोळ, श्रद्धा चिंचोळे, सिद्धेश कुटे, स्वरा कुर्टे, स्वरा जेवे, उदयन काळे आदी विद्यार्थ्यांनी यश मिळवले. ब श्रेणीत : यश वाकचौरे, सोहम बोरुडे, रामेश्वर घोडके, ऋषिकेश जगताप, संस्कार साळवे, सार्थक जायभाय, श्रावणी ढगे, श्रावणी पवार, श्रेया केदार, अस्मिता उमाप, पायल राठोड, प्रणित अवसरे, प्रसाद पाटील यांनी यश संपादन केले. महाराष्ट्र शासन आयोजित या परीक्षेत मिळालेल्या यशाबद्दल विद्यार्थ्यांचा आई-वडिलांच्या हस्ते शासकीय प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. गुलाबपुष्प व पेढे भरवून टाळ्यांच्या कडकडाटात हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कलाशिक्षक व आर.एस.पी. अधिकारी राज धस यांनी कला शिक्षणाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, कला विषयातून विद्यार्थ्यांना विविध करिअर संधी उपलब्ध होऊ शकतात.

कला विषयातील पदवी, तसेच ॲनिमेशन, पेंटिंग, कमर्शियल आर्ट, जी.डी. आर्ट, फोटोग्राफी, व्हिडिओ शूटिंग, टेक्सटाइल डिझायनिंग, ए.टी.डी. आदी अभ्यासक्रमांतून उत्तम प्रगती साधता येते. कलेची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना पालकांनी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

# अनुसूचित जमाती विद्यार्थ्यांसाठी परदेशी उच्च शिक्षण शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अहमदनगर । रयत समाचार**

शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या पात्र विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांनी केले आहे.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणाची संधी मिळावी तसेच त्यांची शैक्षणिक गुणवत्ता जागतिक स्तरावर विकसित व्हावी, या उद्देशाने ही शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सन २०२६२७ या शैक्षणिक वर्षात परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येणार आहे. लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असणे तसेच विद्यापीठांची 'क्यूएस' रँकिंग मर्यादा २०० च्या आत असणे आवश्यक आहे. विहित निकषांनुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास कुटुंबाची उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल करण्यात येईल तसेच क्यूएस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० नंतर चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

**या शिष्यवृत्तीअंतर्गत शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक साहित्य व इतर आकस्मिक खर्च, विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क तसेच आरोग्य विमा आदी खर्चाचा समावेश आहे. शैक्षणिक आकस्मिक खर्चासाठी अमेरिका व इतर देशांसाठी (यु.के. वगळून) दरवर्षी १,५०० अमेरिकी डॉलर, तर यु.के.साठी दरवर्षी १,१०० जीबीपी इतका निधी देण्यात येणार आहे.**

आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन

परदेशातील उच्च शिक्षणासाठी आवश्यक , किंवा समकक्ष प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. या योजनेसाठी अर्ज करणारा विद्यार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील व महाराष्ट्राचा रहिवासी असावा. पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे तर पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी ४० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. अधिक माहिती व अर्ज प्रक्रियेबाबत संबंधितांनी शासनाच्या http://fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पाकिस्तानात बलुच आणि सिंध प्रांतात स्वातंत्र्यासाठी आंदोलन

पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये स्वतंत्र बलुचिस्तानसाठी बलुचिस्तानी नागरिकांनी सरकारविरोधात एल्गार पुकारून सरकारला आवाहन दिले आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराविरुद्ध लढा पुकारून स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा देखील केली आहे. मागील काही महिन्यांपासून बलुच लिबरेशन आर्मी आणि पाकिस्तानी लष्कर यातील संघर्ष वाढत चालला आहे. आताही तिथे मोठा हिंसाचार चालू असून बलुच नॅशनल आर्मीने बलुचिस्तान मधील काही भूभाग बळकावला असल्याची बातमी वाचायला मिळाली. बलुच आर्मी आणि पाकिस्तानी लष्कर यांच्यात तिथे तुंबळ लढाई सुरू असून बलुचिस्तान लिबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान लष्कराला लष्कराला अक्षरशः नाकेनऊ आले आहे. सीमेवर भारतीय लष्कराशी आणि सीमेच्या आत बलुचिस्तान लीबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान अक्षरशः भिकेकंगाल झाला आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला गेल्याने पाकिस्तान जगात कटोरा घेऊन फिरत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला निधी दिला असला तरी त्यासाठी अनेक अटी घातल्या आहेत. पाकिस्तानात महागाई इतकी वाढली आहे की पाकिस्तानी नागरिकांना एकवेळचे जेवण मिळणे देखील मुश्किल झाले आहे. महागाईने जनता मेटाकुटीला आली. त्यात भारताने सिंधू जल करार स्थगित केल्याने पाकिस्तानी नागरिकांवर पाण्यासाठी वणवण फिरण्याची देखील वेळ आली. जर भारताने हा जल करार पूर्ववत केला नाही तर भविष्यात पाकिस्तानात मोठी पाणीबाणी निर्माण होऊ शकते यावर तोडगा म्हणून पाकिस्तानच्या शरीफ सरकारने ग्रीन पाकिस्तान इनिशीएटीव्ह हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. सुमारे साडेतीन हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प चीनच्या मदतीने पकिस्तान साकारणार आहे. या प्रकल्पास पाकिस्तानची दुसरी हरित क्रांती संबोधली जातेय. या प्रकल्पाअंतर्गत पाकिस्तानातील चेलिस्तान वाळवंटातील सुमारे ४८ लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यासाठी शेकडो किलोमिटरची सहा कालवे काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाकडे पाकिस्तान सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून पाहण्यात येत आहे मात्र हाच प्रकल्प आता पाकिस्तानसाठी डोकेदुखी बनला आहे कारण या प्रकल्पाने सिंध प्रांतात येणारे पाणी पंजाब प्रांतात वळवले जाईल असे सिंध प्रांतातील नागरिकांना वाटते. आपल्या हक्काचे पाणी पंजाब प्रांताला मिळणार असल्याने सिंध प्रांतातील नागरिक प्रचंड अस्वस्थ आहेत या अस्वस्थतेतूनच तेथील नागरिक रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकारविरुद्ध आंदोलन करत आहेत. भारत आणि बलुचिस्तान आर्मी पुढे हतबल झालेल्या शरीफ सरकारपुढे ही नवी डोकेदुखी उभी ठाकली आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतातील लोकही आता सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहेत. हे आंदोलन देखील हिंसक बनले आहे. काही दिवसांपूर्वी संतप्त आंदोलकांनी सिंध प्रांतातील गृहमंत्र्यांच्या घराला आग लावली होती यावेळी झालेल्या गोळीबारात तीन नागरिकांचा मृत्यू झाला होता. हे आंदोलन वाढतच चालले आहे. पाकिस्तान लष्कर आणि सरकारमध्ये पंजाबचे वर्चस्व असून त्यांचे सिंधच्या विकासाकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष होत असल्याची तेथील नागरिकांची तक्रार आहे. पाकिस्तान सरकार सिंध प्रांतावर कायम अन्याय करीत असल्याची भावना तेथील नागरिकांची झाली आहे. या अन्यायाविरोधात सिंध प्रांतातील नागरिक आवाज उठवत आहेत. इतकेच नाही तर या आंदोलनात सिंध प्रांतातील नागरिकांनी स्वतंत्र सिंधू देशाची मागणी केली आहे. ही मागणी आताच नव्हे तर मागील काही वर्षांपासून करण्यात येत आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतात हिंदू धर्मीय नागरिक मोठया प्रमाणात राहतात. या नागरिकांवर गेल्या काही वर्षांपासून अन्यायाची मालिका सुरू असून ही अन्यायाची मालिका संपावी आणि सिंध प्रांतातील हिंदू नागरिकांना त्यांचे अधिकार आणि हक्क प्राप्त व्हावेत यासाठी जगभरातून या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. मागील काही काळात पाकिस्तानातील हिंदू महिलांवर विशेषतः सिंधी हिंदू महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे. या भागातील मुलींचे, महिलांचे फसवून, पळवून, सक्तीने धर्मांतर केले जात आहे. वाढत्या अत्याचारामुळे येथील नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. वारंवार सरकारला विनंती करूनही सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने तेथील नागरिक अस्वस्थ होते त्यातच या नव्या प्रकल्पाची भर पडल्याने तेथील नागरिकांची अस्वस्थता आणखी वाढली. आपल्यावर होणारा अन्याय दूर करायचा असेल तर स्वतंत्र सिंधू देशाशिवाय पर्याय नाही अशीच भावना तेथील नागरिकांची झाली आहे त्यातूनच स्वतंत्र सिंधू देशाची मागणी करण्यात आली. मागील वर्षीच स्वतंत्र सिंधू देशाला भारत आणि अमेरिकेने पाठिंबा द्यावा अशी विनंती करण्यात आली होती. त्यावर दोन्ही देशांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भविष्यात या दोन्ही देशांना आंदोलनकर्त्यांच्या या मागणीची दखल घ्यावीच लागेल आणि जेव्हा हे दोन्ही देश या मागणीची दखल घेतील तेव्हा पाकिस्तानची आणखी शकले झालेली असतील. भारताचे शकले करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानचेच शकले होण्याची वेळ आली आहे. काश्मीरला स्वतंत्र करून भारताची शकले करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानला बलुच आणि सिंध प्रांतातच स्वातंत्र्याची आंदोलने होऊ लागल्याने पाकिस्तानचीच शकले होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भविष्यात पाकिस्तानातून बलुचिस्तान आणि सिंध हे दोन नवीन देश निर्माण झाले तर आश्चर्य वाटायला नको.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# ‘कृष्णमंजरी’ आणि ‘सारसाच्या चोचीतील अवतार’चे प्रकाशन

**नागपूर । रयत समाचार**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, म्हणजेच २५ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथे कुसुमाई प्रकाशन इंटरनॅशनलतर्फे दोन महत्त्वपूर्ण काव्यग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. जगप्रसिद्ध रोमानियन महाकवी व शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. लिव्हिउ पेन्डेफुण्डा यांच्या Avatar in a Stork’s Beak या इंग्रजी कवितासंग्रहाचा महाकवी सुधाकर गायधनी यांनी केलेला मराठी अनुवाद ‘‘सारसाच्या चोचीतील अवतार’’ या नावाने प्रकाशित झाला. यासोबतच कुसुमाई प्रकाशनच्या प्रकाशक व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित कवयित्री डॉ. मंजूषा सावरकर यांच्या मराठी कविता संग्रह ‘‘कृष्णमंजरी’’चा प्रा. डॉ. मधुलता व्यास यांनी केलेला हिंदी अनुवादही प्रकाशित करण्यात आला.

हा प्रकाशन सोहळा कुसुमाई लॉन येथे विदर्भाचे सांस्कृतिक नेते व समाजसेवक, माजी महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमास ज्येष्ठ कवयित्री व साहित्य विहार नागपूरच्या अध्यक्षा आशाताई पांडे, महाकवी सुधाकर गायधनी, डॉ. मंजूषा सावरकर, माजी सदस्य महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी व अनुवादक प्रा. डॉ. मधुलता व्यास तसेच हिंदी कवयित्री रीमा चड्ढा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. यावेळी बोलताना आशाताई पांडे यांनी डॉ. मंजूषा सावरकर यांच्या हिंदी अनुवादित कवितांमधील सौंदर्य उलगडून सांगितले. डॉ. मधुलता व्यास यांनी मूळ मराठी कविता व त्याचा हिंदी अनुवाद यातील वैशिष्ट्यपूर्ण नाते स्पष्ट केले. यानंतर महाकवी सुधाकर गायधनी यांनी ‘‘कृष्णमंजरी’’च्या कवितांचे मूल्यमापन करताना हा संग्रह छायावादी असून निसर्ग व निर्मिती या दोन्ही रूपांचे एकात्म दर्शन घडवतो, असे नमूद केले. तसेच प्रा. डॉ. लिव्हिउ पेन्डेफुण्डा यांच्या कवितांच्या मराठी अनुवादाबाबत सखोल भाष्य करताना त्यांनी सांगितले की, हा अनुवाद करणे हे एक आव्हान होते.







या प्रक्रियेत त्यांना पुत्र प्रदीप यांचे मौलिक सहकार्य लाभले. प्रा. डॉ. पेन्डेफुण्डा हे तत्वज्ञानी कवी असून ते विश्व साहित्य अकादमीचे उपकुलपती, निबंधकार, समीक्षक व न्यूरोलॉजी विषयाचे प्राध्यापक आहेत. त्यांच्या कवितांमधील जीवनविषयक चिंतन, प्रतिके व प्रतिमा वाचकाला आत्मसंवादाच्या प्रवासात घेऊन जातात, असे त्यांनी नमूद केले. समारोप करताना अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी दोन्ही कवी, अनुवादक व प्रकाशक डॉ. मंजूषा सावरकर यांचे अभिनंदन केले. साहित्यिकांनी भाषावादाऐवजी भाषांमधील संवाद वाढवावा, असे मत त्यांनी व्यक्त केले. या समारंभाला अनेक कवी, अभ्यासक, प्राध्यापक, पत्रकार व रसिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अल्का झाडे यांनी केले, तर कवयित्री माला पारधी यांनी उपस्थितांच्या वतीने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मधुकर आंबेकर, डॉ. माधुरी डांगरे, डॉ. श्वेता घरतकर, देवयानी गायधनी, प्रा. सुनील सावरकर, प्रतीक व हृषिकेश सावरकर, सौ. मौसम सावरकर, कु. सानवी आदींनी सहकार्य केले. वऱ्हाडी भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमस्थळी कुसुमाई स्टॉलवरील दोन्ही अनुवादित पुस्तकांना रसिकांनी मोठी पसंती दिली.

**महाकवी प्रा. डॉ. पेन्डेफुण्डा यांच्या ‘‘सारसाच्या चोचीतील अवतार’’ या कवितासंग्रहाच्या मराठी रूपांतराचे प्रकाशन करण्याची संधी महाकवी सुधाकर गायधनी यांच्यामुळे मिळाली, ही कुसुमाई प्रकाशनासाठी अत्यंत आनंदाची बाब आहे. त्यांनी मूळ इंग्रजी संग्रह** Avatar in a Stork’s Beak **चा अत्यंत न्याय्य आणि समर्थ मराठी अनुवाद केला आहे. हा कवितासंग्रह मराठी वाचकांनी आवर्जून वाचावा.**

**डॉ. मंजूषा सावरकर,** कवयित्री

## नॅशनल थाई बॉक्सिंग स्पर्धेत पांढरकरला ‘गोल्डन टायटल बेल्ट’

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



महाबळेश्वरपंचगणी येथे ता. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान पार पडलेल्या नॅशनल टायटल बेल्ट प्रीमियर लीग थाई बॉक्सिंग स्पर्धेत श्रीगोंदा तालुक्यातील पंतनगर कम्युनिटी हॉल कराटे ग्रुपचा विद्यार्थी ओम समीर पांढरकर याने दमदार कामगिरी करत ‘गोल्डन टायटल बेल्ट’ पटकावला. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशातील विविध राज्यांतील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेचे आयोजन भारतीय थाई बॉक्सिंग संघटनेतर्फे करण्यात आले होते. यावेळी भारतीय थाई बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष पी. वाय. आत्तार तसेच संतोष खैरनार यांची प्रमुख उपस्थिती होती. ओम पांढरकर याला ग्रँडमास्टर समीर पांढरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. गेल्या २१ वर्षांपासून समीर पांढरकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा तालुक्यातील अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करत तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रम पाचपुते, नगराध्यक्षा सुनिता खेतमाळीस तसेच सर्व नगरसेवक यांच्या वतीने ओम पांढरकर याचे अभिनंदन करण्यात आले असून त्याच्या पुढील क्रीडा कारकिर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## बिगरशेतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची गरज नाही

**बेलापूर । शफीक बागवान**

राज्य सरकारने शहरांभोवतीच्या गावांमधील विकासकामांना चालना देण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. यानुसार आता बिगरशेती परवानगीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची गरज नाही. त्यासाठी महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ मधील ४१ ते ४७ आणि १०८ ते १२० ही कलमेच रद्द करण्यात आली आहेत. त्यासंदर्भात राज्य सरकारने राजपत्र प्रसिद्ध केले आहे.

भोगवटा वर्ग २ च्या जमिनींबाबत परवानगी दिल्यास सातबारा उताऱ्यावरील इनाम, कुळ, वतन प्रकाराची तपासणी करण्याचे अधिकार महसूल विभागाला आहेत. ही तपासणी करण्याचीही स्पष्टता नाही. ही तपासणी परवानगी पूर्वी करावी की त्यानंतर करावी, हेही सांगण्यात आलेले नाही. यासाठी शासकीय नजराणा भरावा लागतो. तो स्थानिक प्राधिकरण घेईल की माफ करेल, हेही स्पष्ट नाही. आता बिगरशेती अधिमूल्य एकदाच भरावा लागेल. त्यामुळे दरवर्षी अधिमूल्य भरण्यासाठीचे हेलपाटे वाचणार आहेत. मात्र, हे अधिमूल्य रहिवास, व्यापारी तसेच औद्योगिक वापरासाठी एकच ठेवले आहे. यापूर्वी तिन्ही प्रयोजनांसाठी वेगवेगळे अधिमूल्य लावले जात होते. त्यामुळे सरकारचा महसूल बुडणार आहे.

एका वापरासाठीची परवानगी दिल्यानंतर गैरवापर झाल्यास दंड आकारून नियमित होणार नाही. बिगर शेतीची नोंद झाल्यानंतर महसूल अभिलेख अद्ययावत करण्याचे काम जिल्हा प्रशासन करते. मात्र, त्यापूर्वीच महसूल विभागाचा अभिप्राय न घेता परवानगी दिल्यास कायदेशीर क्लिष्टता निर्माण होऊ शकते, असेही अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. राज्य सरकारच्या या राजपत्राच्या प्रसिद्धीनंतर १ जानेवारीपासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

**ही परवानगी देताना भोगवटा वर्ग १ जमिनींबाबत कोणतीही अडचण नसेल. मात्र, परवानगी देताना त्याची बिगर शेतीत नोंद करताना गाव नमुना २ मध्ये करायची की नाही? ती कोण करणार? नोंद होणार नसल्यास हा गाव नमुना बंद करायचा का? अशी कोणतीही स्पष्टता जिल्हा प्रशासनाला देण्यात आलेली नाही.**

# कोपरगाव नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या स्थलांतराला गती

## अग्निशमन यंत्रणेसाठी निधी देण्यास जिल्हाधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद

**कोपरगाव । रयत समाचार**



कोपरगाव नगरपरिषदेकरिता माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या विशेष प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुमारे चार वर्षांपूर्वी पूर्ण झाले असून सध्या फर्निचरचे काम अंतिम टप्प्यात आहे. लवकरच या इमारतीत नगरपरिषदेचे प्रशासकीय कामकाज स्थलांतरित करण्याचा मानस आहे. मात्र, स्थलांतरासाठी आवश्यक असलेली अग्निशमन संयंत्र प्रणाली अद्याप पूर्ण न झाल्याने त्यासाठी सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याची मागणी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे करण्यात आली.

जिल्हाधिकारी कोपरगाव दौऱ्यावर आले असता नगराध्यक्ष पराग संधान, गटनेते प्रसाद आढाव, माजी उपनगराध्यक्ष विजय वाजे तसेच नगरसेवक संतोष शिंदे यांनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ही मागणी सविस्तरपणे मांडली. नवीन प्रशासकीय इमारतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निशमन प्रणाली अत्यावश्यक असल्याने त्यासाठी तातडीने निधी मंजूर करण्यात यावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. या मागणीस जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजाला लवकरच गती मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, युवानेते विवेक कोल्हे यांनीही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून कोपरगाव शहराशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक बाबी त्यांनी यावेळी मांडल्या. यावेळी शासकीय कार्यालये व शासकीय इमारतींकडून नगरपरिषदेला मिळावयाचा थकीत मालमत्ता कर तातडीने वर्ग करण्यात यावा, जेणेकरून त्या निधीतून शहरातील विकासकामे अधिक प्रभावीपणे राबविता येतील, अशी मागणी उपस्थित मान्यवरांनी केली. विशेषतः तहसील कार्यालयाकडे असलेली थकीत रक्कम नगरपरिषदेला मिळावी, अशी आग्रही भूमिका मांडण्यात आली. तसेच पर्यावरणपूरक धोरण व दीर्घकालीन खर्च बचतीच्या दृष्टीने कोपरगाव शहरातील सर्व पथदिवे सौरऊर्जेवर आधारित करण्याची मागणीही करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी या सर्व मागण्यांची गांभीर्याने दखल घेत सकारात्मक भूमिका दर्शविल्याने कोपरगाव शहराच्या विकासाला नवसंजीवनी मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

